सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
# बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२१/M/००१२५३

**अपिलार्थी श्री. संजय सिताराम कु-हाडे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ कार्यालय अधीक्षक**
पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई -०१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस महासंचालक यांचे उपसहाय्यक (गुन्हे)**
पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई -४०० ००१

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २७.०६.२०२४</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित(अपिलार्थीची नोटीस पोस्टाने परत)
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १५.०२.२०२० | २९.१०.२०२० | २४.११.२०२० | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०८.०४.२०२१ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २९.१०.२०२० संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी दि. १५.०२.२०२० रोजीच्या माहिती अर्जानुसार महाराष्ट्र राज्यातील पोलीस आयुक्तालयांमध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मधील कलम १५४(३) अन्वये नागरिकांकडून प्राप्त झालेल्या वर्दीबाबतच्या निम्न कार्यवाहीसंदर्भातील शासन नियमावलींची १० मुद्यांवर माहिती विचारली आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.१०.२०२० नुसार सदरची माहिती कार्यासनाच्या अभिलेखावर उपलब्ध नाही त्यामुळे आपणास उपलब्ध करुन देता येत नाही असे उत्तर दिलेले आहे. अपिलार्थींचे सदर उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी दि. २४.११.२०२० रोजी प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे निवेदन दि. २६.०६.२०२४ आयोगासमोर सादर केले. ते अभिलेखावर घेण्यात आले. सदर निवेदनावरुन असे निदर्शनास येते की, संबंधीतांची प्रथम अपील सुनावणी दि. ०८.०१.२०२१, २२.०१.२०२१, ०८.०२.२०२१, २५.०२.२०२१, १८.०३.२०२१ व १७.०९.२०२१ रोजी उपस्थित राहण्यासाठी कळविले. परंतु अपिलार्थी अनुपस्थित राहिले व प्रथम अपील सुनावणी झालेली नाही.

..२/-

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींच्या माहिती अर्जावर सुधारीत उत्तर देण्याचे मान्य केले.

अपिलार्थींनी विचारलेली अनेक मुद्यांची माहिती माहितीचा अधिकार अधिनियमाचे कलम ४ नुसार उपलब्ध असणे आवश्यक आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

१) **जन माहिती अधिकारी यांनी मुद्देनिहाय माहिती अपिलार्थींना ३० दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये नोंदणीकृत टपालाने निशुल्क पुरवावी.**

२) **अपील निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास
२७-६-२०२४

**मुंबई**
**दिनांक : २७.०६.२०२४**

State Information Commission
सत्यमेव जयते
Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**